# बृहन्मुंबई महानगरपालिका
## परिपत्रक

विषय:- सोमवार दि.०६.०७.२०२६ रोजीचो अर्ध्या दिवसाची सुट्टी

संदर्भ:- १. राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (State Disaster Management Authority) यांची X.COM व TWITTER वरिल पोस्ट
२. शासन परिपत्रक क्र. जीएडी-१८०१२/११/२०२६-जीएडी(रवका-१)(ई-१७४०९१८) दि. ०६.०७.२०२६

उपरोक्त संदर्भित विषयांन्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व खाते/विभाग/रूग्णालय प्रमुख यांना पुढील प्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

भारतीय हवामान विभागाने (IMD) मुंबई महानगर क्षेत्रासाठी अतिवृष्टीचा इशारा (रेड अलर्ट) जारी केला असून ताशी ८० ते ९० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता वर्तविली आहे. या पार्श्वभूमीवर अध्यक्ष तथा राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष या नात्याने मा. मुख्यमंत्री महोदयांनी मुंबईतील वादळी वारे व पावसाची सद्य:स्थिती विचारात घेता दि.०६.०७.२०२६ करिता शासनातील अत्यावश्यक विभाग वगळता अर्ध्या दिवसानंतर कार्यालये सोडण्यात यावीत असे निर्देश दिलेले आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या खाते/विभाग/रूग्णालय यांना (अत्यावश्यक सेवा वगळता) जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकारण या नात्याने सोमवार, दि.०६.०७.२०२६ रोजी दुपारनंतर अर्ध्या दिवसाची सुट्टी राहिल.

प्रस्तुत परिपत्रक http://portal.mcgm.gov.in आणि http://mybmcemp.mcgm.gov.in/circulars या संकेतस्थळांवर उपलब्ध करण्यात येत आहे.

सही /- ०६.०७.२०२६
(शारदा शा. गोसावी)
प्रमुख कर्मचारी अधिकारी

सही /- ०६.०७.२०२६
(किशोर गांधी)
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)

सही /- ०६.०७.२०२६
(श्रीम. प्राजक्ता वर्मा)
अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर)

सही /- ०६.०७.२०२६
(श्रीम. अश्विनी भिडे)
महानगरपालिका आयुक्त

महानगरपालिका आयुक्तांचे कार्यालय,
क्रमांक:प्रकअ/२४८/सर्वसा (एमओपी/७९६)
दिनांक: दि. ०६ जुलै २०२६

प्रत-------------------------------------------------------(जादा----------- प्रतीसह)
माहितीकरिता व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीकरिता कृपया अग्रेषित.

6/7/26

(श्रीम. निलम न. पाडळकर)
प्रशासकीय अधिकारी (आयुक्त)
महानगरपालिका आयुक्तांचे कार्यालय

6/7/26

कार्यालये लवकर सोडण्यास परवानगी देण्याबाबत.
मंत्रालय व बृहन्मुंबईतील इतर शासकीय कार्यालये.

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक जीएडी-१८०१२/११/२०२६-जीएडी (रवका-१) (ई-१७४०९१८).**
मंत्रालय (विस्तार इमारत), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई. पिन ४०००३२.
दिनांक: ०६ जुलै, २०२६

## परिपत्रक.

भारतीय हवामान विभागाने (IMD) मुंबई महानगर क्षेत्रासाठी अतिवृष्टीचा इशारा (Red Alert) जारी केला असून ताशी ८० ते ९० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता वर्तवली आहे. या पार्श्वभूमीवर अध्यक्ष तथा राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष या नात्याने मा. मुख्यमंत्री महोदयांनी मुंबईतील वादळी वारे व पावसाची सद्य:स्थिती विचारात घेता दि.०६/०७/२०२६ करिता खालीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत-

१. शासनातील अत्यावश्यक विभाग वगळता अर्ध्या दिवसानंतर कार्यालये सोडण्यात यावीत.

२. सर्व खाजगी कार्यालये यांनी Work From Home करावे.

ही बाब लक्षात घेता, मंत्रालय आणि बृहन्मुंबईतील सर्व शासकीय कार्यालयांमधील अधिकारी व कर्मचारी यांना, सोमवार, दिनांक ०६ जुलै २०२६ रोजी, अर्ध्या दिवसाने कार्यालय सोडण्यास, याद्वारे, पुढील अटींवर, परवानगी देण्यात येत आहे:-
अटी:-

१. शासनातील अत्यावश्यक सेवेशी संबंधित कार्यालयांमधील अधिकारी व कर्मचारी यांच्याबाबतीत संबंधित विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख हे निर्णय घेतील.
२. इतर कार्यालयांच्या बाबतीत, तातडीने अथवा कालमर्यादित काम असल्यास असे काम पार पाडण्यासाठी जबाबदार अधिकारी व कर्मचारी यांच्याबाबतीत संबंधित विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख हे निर्णय घेतील.
३. सर्व खाजगी कार्यालये यांनी Work From Home करावे.

२. हे शासन परिपत्रक, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२६०७०६१२३५५४११०७ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by ATUL NILKANTHRAO PATNE
Date: 2026.07.06 12:37:01 +05'30'

**(डॉ. अतुल पाटणे)**
**प्रधान सचिव**

**प्रति,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, लोकभवन, मुंबई,

२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.

३) मा. उप मुख्यमंत्री, नगर विकास यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

४) मा. उप मुख्यमंत्री, वित्त व नियोजन यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.

५) सर्व मा. मंत्री/मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

६) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.

७) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.

८) महासंचालक, माहिती व जनसंपर्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

९) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.

१०) जिल्हाधिकारी, मुंबई शहर/मुंबई उपनगर.

११) बृहन्मुंबईतील सर्व शासकीय कार्यालये *(संबंधित प्रशासनिक विभाग यांच्यामार्फत).*

**प्रत-**

१) मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.

२) प्रधान सचिव (प्र.ना.उ. व सुशासन) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.

३) सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.

४) निवड नस्ती, रवका-१.